| | |
|---|---|
| | **जिल्हा परिषद,बीड**<br>**(सामान्य प्रशासन विभाग)**<br>**ग्रामपंचायत विभाग** |

फोन क्रमांक-०२४४२-२२२२९७, फॅक्स-०२४४२-२२२२०५ ईमेल आयडी-dyceobeed@gmail.com

जा.क्र.साप्रवि-७/पंचायत/राग्रास्वअ/कावि/ 52 /२०१९ दिनांक- 19 / 1 /२०१९

**जाहीर नोटीस**

**अभ्यास दौ-यासाठी कोटेशन/दरपत्रक मिळणे बाबत.**

विषय:-जिल्हा परिषदेच्या अभ्यास दौ-यासाठी कोटेशन/दरपत्रक सादर करणे बाबत.

(चहा/नाष्टा +भोजन + निवास ईत्यादी सुविधेसह)

संदर्भ:- १.कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन यांचे पत्र राग्रास्व-२०१८/प्र.क्र.१२२/आस्था-१५ दि.१२/११/२०१८

२.मा.राज्य प्रकल्प संचालक यांचे पत्र जा.क्र.रा.ग्रा.स्व.अ/प्रशि/२१९/२०१८-१९ दि.३०/१०/२०१८.

३. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,बीड यांची मंजुर टिपणी दिनांक १९/०१/२०१९

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते कि, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान सन २०१८-१९ अंतर्गत जिल्हा परिषद,बीड अंतर्गत लोकप्रतिनिधी/अधिकारी/कर्मचारी (एकुण ४० प्रतिनिधी) जिल्हा परिषद,बीड अंतर्गत राज्यातंर्गत दौ-यासाठी जामखेड, करमाळा,टेंभुर्णी मार्गे ग्रा.पं.अकलुज जि.सोलापुर (ग्रामपंचायत भेट),ग्रा.पं लोधवडे ता.माण (जलसंधारण व स्मार्ट ग्राम पाहणी) ग्रामपंचायत निढळ ता.खटाव(जलसंधारण काम पाहणी) ग्रामपंचायत बनवडी ता.कराड (मिटरव्दारे पाणी पुरवठा/घनकचरा व्यवस्थापन) ग्रामपंचायत नागटाणे ता.सातारा (घनकचरा प्रकल्प) या उत्कृष्ट व नाविन्यपुर्ण कामकाज केलेल्या ग्रामपंचायतीचा अभ्यास करणेसाठी ३ दिवसीय २ रात्री व ३ दिवस अभ्यास दौ-याचे आयोजन करावयाचे आहे.सदर अभ्यास दौ-याकरिता मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार यांचेकडुन ४० व्यक्तीसाठी (चहा/नाष्टा + भोजन +निवास ईत्यादी सुविधेसह) कोटेशन/दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**कोटेशन/दरपत्रक सादर करणे बाबत सुचना खालीलप्रमाणे**

१) यात्रा कंपनी/सेवा पुरवठादार मान्यताकृत असावी.

२) उक्त अभ्यास दौरा अंदाजीत ५०० ते १२०० किमीचा असेल त्यानुसार कोटेशन सादर करावे.

३) अभ्यास दौ-यात ४० जि.प.लोकप्रतिनिधी/अधिकारी/कर्मचा-याचा समावेश राहणार आहे.

४) कोटेशन नॉन ए.सी. निवास + १ वेळ नाष्टा + २ वेळा चहा + २ वेळा भोजन या प्रकारे सादर करण्यात यावे. निवास एका खोलीमध्ये २ ते ३ व्यक्ती व भोजन दर्जा उच्च प्रतिचा असावा.

५) कोटेशन/दरपत्रक उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद,बीड यांचे नावे ग्रामपंचायत विभागात समक्ष अथवा पोस्टाने नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसात सादर करावे. मुदतीत प्राप्त न झालेले अथवा इतर कुठल्याही कारणाने विलंबाने प्राप्त झालेले कोटेशन/दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

६) सदर अभ्यास दौरा नैसर्गिक कारणास्तव व इतर कारणास्तव सातारा जिल्हा व्यतिरिक्त इतरत्र आयोजित करण्याचा, अंशत: बदल करण्याचा किंवा अभ्यास दौरा रद्द करण्याचे अधिकार या कार्याकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

अमोल येडगे(भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,बीड**

Scanned by CamScanner